**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १२१/२०२४ मध्ये निशाणी क्र. ५१ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज वाचला. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, निशाणी क्र. ५ चा अंतिम हुकूम होईपर्यंत प्रतिवादींनी दि. १६/१२/२०२४ रोजीच्या नोटीसप्रमाणे दावा मिळकतीचा कब्जा घेऊ नये असा अंतरिम स्टेटस्कोचा हुकूम व्हावा.

२) प्रतिवादी क्र. ४ व ५ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ हे या कामी वकीलांमार्फत हजर झाले आहेत. परंतु सदर प्रतिवादी क्र. ४ व ५ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी या अर्जास म्हणणे दिले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ व ५ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादीच्या विद्वान वकीलांचा व प्रतिवादी क्र. ६ ते ९ तर्फे विद्वान सहाय्यक जिल्हा सरकारी वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना व त्यांच्या विद्वान वकीलांना या अर्जाच्या युक्तीवादाकामी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने या अर्जावर प्रतिवादी क्र. ४ व ५ तर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ६ ते ९ हे या कामी दिनांक २०/०३/२०२४ रोजी सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत हजर झाले आहेत. परंतु, प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी आजपर्यंत या कामी दाव्यास लेखी जबाब व निशाणी क्र. ५ कडील अर्जास म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी त्यांचा लेखी जबाब व निशाणी क्र. ५ कडील अर्जाचे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी आजपर्यंत या कामी दाव्यास लेखी जबाब व

निशाणी क्र. ५ कडील अर्जास म्हणणे दाखल केले नाही ही बाब विचारात घेता व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे विद्वान वकील या प्रकरणाच्या सुनावणीकामी पुकारले असता गैरहजर आहेत ही बाब विचारात घेता व अर्जातील नमुद कारण विचारात घेता माझ्या मते पुढील नेमलेल्या तारखेपर्यंत दावा मिळकतीसंदर्भात "जैसे थे" परिस्थीती ठेवण्याबाबत प्रतिवादी क्र. ४ व ५ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांना आदेशीत करणे न्यायाचे व उचित आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) प्रतिवादी क्र. ४ व ५ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी पुढील नेमलेल्या तारखेपर्यंत दावा मिळकतीसंदर्भात "जैसे थे" परिस्थीती ठेवावी.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.01.21 17:57:15 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांकः-२१/०१/२०२५ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.